# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२३७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र- १९४** **दिनांक :- २३/१०/२०२६**

## " फत्तेपुर पोलिसांची प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणाऱ्याविरुद्ध कारवाई एकुण १,०६,३००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करत ०१ आरोपी जेरबंद "

जळगाव जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने फत्तेपुर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. निरीक्षक अंकुश जाधव यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांना जास्ती-जास्त गोपनिय माहिती संकलीत करुन अवैध गुटखा विक्री/वाहतुक करणाऱ्या इसमांविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेशित केले.

दिनांक २२/१०/२०२६ रोजी रात्री २२.०० वाजेच्या सुमारास फत्तेपुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत फत्तेपुर ते कसबापिंप्री रस्त्यादरम्यान एक इसम प्रतिबंधित विमल पानमसाला व V-1 सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलीस पथकाने हिंगणे फाट्याजवळ सापळा रचून रात्री २२.३० वाजेच्या सुमारास **आरोपी प्रसाद दामू वाणी, वय २१ वर्षे, रा. चिंचोलीपिंप्री, ता. जामनेर, जि. जळगाव** यास ताब्यात घेतले असुन, त्याच्याकडून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर बाबत अन्न व सुरक्षा अधिकारी किशोर हिंमतराव बाविस्कर यांना माहिती देण्यात आली. यांनी समक्ष पोलीस स्टेशनला येवुन शहानिशा करुन दिलेल्या फिर्यादीवरुन **दि. २३/१०/२०२६ रोजी फत्तेपुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. २३५/२०२६ भा. न्या. सं. २०२३ कलम १२३, २२३, २७४, २७५ सह अन्न व सुरक्षा आणि मानके अधि. २००६ चे कलम ३०(२), (अ), २६ (२) (i), २६ (२) (iv), २७(३) (d), २७(३) (e), ३, ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**-: जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशील :-**

| अ.क्र. | जप्त मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|
| १ | विमल पानमसाला | २९,०४०/- |
| २ | V-1 सुगंधित तंबाखू | ७,२६०/- |
| ३ | इलेक्ट्रिक स्कूटर क्र. MH-19-EY-1357 | ७०,०००/- |
| **एकूण** | | **१,०६,३००/-** |

सदर गुन्ह्यात आरोपी प्रसाद दामू वाणी यास दिनांक २३/१०/२०२६ रोजी अटक करण्यात आली असून, मा. न्यायालयाने त्यास दिनांक २४/१०/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

**सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक नखाते, चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बापू रोहम यांच्या मार्गदर्शनाखाली फत्तेपुर पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक अंकुश जाधव यांच्या यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक योगेश महाजन, पोलीस हेड कॉन्स्टेबल गणी तडवी, पोलीस कॉन्स्टेबल भूषण पाटील, चेतन तांगडे व अरुण पाटील यांचे पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश महाजन करीत आहेत.**

***जळगाव जिल्हा पोलीस दलामार्फत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे. अशा अवैध व्यवसायांबाबत नागरिकांना माहिती मिळाल्यास त्यांनी जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा किंवा डायल ११२ वर माहिती द्यावी.***

**SD/-**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*****************************************************************************